B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO322 (CC CCCXXII)
ISSN : 2278-9308
Octember, 2021

# भारतातील सार्वजनिक आरोग्य

प्रा. मनीषा महारुद्र गाढवे
(गृहशास्त्र विभाग) वसंतदादा पाटील महाविध्यालय पाटोदा ता.पाटोदा जि.बीड
PH.NO: 9850404747,Gmail : gadhavem74@gmail.com

मानव विकास परिगणीत करण्यासाठी आरोग्य हा महत्वाचा घटक आहे. कुशल मनुष्यबळ निर्मितीकरिता आर्युवेद योग व निसर्गोरोपचार, युनानी, सिध्द व होमीओपॅथी यासह अनेक वैध्यकीय व निम वैध्यकीय संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. राज्यामध्ये त्रिस्तरीय सार्वजनिक आरोग्य सुविधा असून ग्रामीण व अर्धनागरी भागात सामाईक आरोग्य केंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, नागरी भागात जिल्हा रुग्णालये, मल्टी स्पेशालिटी रुग्णालये व वैध्यकीय महाविध्यालय आहेत. राज्यातील जनतेला सहजतेने व परवडण्याजोगी आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य शासन अनेक कार्यक्रम व योजना राबवीत आहे. आरोग्य निगा मनुष्यबळात राज्य अग्रणी असून राज्याच्या आरोग्य विषयक गरजा पूर्ण करण्यासाठी राज्याकडून प्रशिक्षित डॉक्टरांचा पुरवठा केला जात आहे. ॲलोपॅथी व भारतीय वैध्यकशास्त्र प्रणाली या दोन्हींची सर्वाधिक वैध्याकीय महाविध्यालय राज्यात आहेत राज्यातील ॲलोपॅथी आर्युवेद, युनानी होमीओपॅथीच्या नोंदणीकृत वैध्यकीय महाविध्यालयाच्या आकडेवारीवर आधारीत डॉक्टराचे लोकसंख्येशी गुणोत्तर सन 2011 मध्ये 1:600 होते आणि ततस्म आकडेवारी सन 2014 मध्ये 1:536 होते. तर केंद्रीय सांख्येकी कार्यालय भारत सरकार यांनी प्रक्षेपित केलेल्या लोकसंख्येवर आधारित राज्यातील नोंदणीकृत ॲलोपॅथी डॉक्टर व लोकसंख्या यांचे गुणोत्तर 1:1775 व 1:1418 इतके होते. महाराष्ट्राचा आरोग्य निर्देशांक चांगला असला तरी इतर राज्यापेक्षा बराच कमी आहे.

• आरोग्य विषयक कार्यक्रम :-

अनरोग्याचा मानवाच्या मानसिक आणि शारीरिक क्षमतांवर होणारा विपरित परिणाम विचारात घेऊन भारत सरकारने मलेरिया, डेंगू, पोलिओ,प्लेग, क्षयरोग, गालगुंडी, कुष्ठरोग, नेत्ररोग, काला – आजार एड्स यासारखे आजार आणि रागाचे निर्मुलन आणि नियंत्रण करण्यासाठी अनेक आरोग्य विषयक कार्यक्रमांची आणखी आणि प्रभावी बजावणी केली आहे. त्याचाच परिणाम म्हणून आज भारतातील बालमृत्यू व बाळंतमाता मृत्यू प्रमाण दर कमी झाला आहे.

• मलेरिया, काळा – आजार, फिलेरिया, जापानी इन्सेफेलडटिस आणि डेंगु या पाच आजारांचे प्रभावीपणे नियंत्रण करण्याच्या हेतूने 20030.04 मध्ये NVBDCP हा कार्यक्रम सुरु करण्यात आले. यात मलेरिया, डेंगू आणि जापानी इन्सेफेलडटिस या आजारांनी मृत्युमुखी पडणा-यांचे प्रमाण निम्यावर घटविणे काला – बाजार आजाराचे 2010 पर्यंत उच्चाटन करणे लेम्फेटिळ, फिलेरियाटिस आजारांचे 2015 पर्यंत उच्चाटन करण्याचे उधिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

• पल्स- पोलिओ कार्यक्रम :-

भारत सरकारच्या आरोग्य विभागाने देशातील पल्स- पोलिओचे उच्चाटन करण्यासाठी कार्यक्रम गेल्या दोन दशकात प्रभावीपणे कार्यक्रम राबविल्यामुळे आज देशातून पोलिओग्रस्तांची संख्या अगदी नगण्यांवर आलेली आहे. 2006 मध्ये देशात फक्त 666 पोलिओग्रस्तांची ओळख झाली. ही संख्या डिसेंबर 2007 मध्ये 471 पर्यंत कमी झाली. आरोग्य विभागामार्फत वर्षातून चार-पाच वेळा पल्स- पोलिओ निर्मूलनाच्या लसीकरणाचा कार्यक्रम राबविला जात आहे.

• क्षयरोग :

जागतिक बँकेच्या 749 कोटी रुपये आर्थिक मदतीच्या सहाय्याने भारतात सुधारित व राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम ( RNTCP ) 1997 – 2002 या कालवधीसाठी राबविण्यात आला. या कार्यक्रमाचा दुसरा टप्पा 2003-04 पासून पुन्हा जागतिक बँकेच्या आर्थिक मदतीने सुरु करण्यात आला आहे. सरकारने निश्चित केलेल्या धोरणानुसार क्षयरोगाने मृत्यूमुखी पडणा-यांचीसंख्या 50% पर्यंत घटविण्यात येणार आहे. आरोग्य विभागाने यासाठी थेट निरीक्षण औषोधोपचार चा अवलंब करण्याचे निश्चित केले आहे.

• कुष्ठरोग :

भारतात कुष्ठरोगीची संख्या दर दहा हजारामागे 573 होती ती 2005 मध्ये फक्त 1.17 आहे. भारत सरकार आणि जागतिक बँक यांच्या संयुक्त विध्यमाने कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात आली.

• अंधत्व :

जगात अंधाची संख्या जवळ – जवळ 45 दशलक्ष अंधाची संख्या भारतात आहे. भारताची वाढती लोकसंख्या , वाढते सरासरी आर्युमान यामूळे ही संख्या आणखी वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे . अंधत्वाचे प्रमुख कारण मोती बिंदू आहे. याबरोबरच मधुमेह दृष्टी हलणे,ग्लुकोमा इ कारणेही कारणीभूत ठरत आहेत भारतात 80 च्या दशकात अंधत्व दर 1.49 % होता तो 2001-2002 मध्ये 1.1 % पर्यंत घटला आहे.साथीचे रोग, संसर्गजन्य रोग, असंसर्गजन्य रोग इ. नियंत्रण करण्यासाठी भारतात ॲलोपॅथी व चिकित्सा पद्धती बरोबरच आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार युनानी, सिध्द आणि होमीऑपेथी या अस्सल भारतीय चिकित्सा पद्धतीचा वापर करण्याला आरोग्य विभागामार्फत प्रोत्साहित करण्यात येत आहे. पाश्चिमात्य चिकित्सा पद्धती आणि भारतीय चिकित्सा पद्धतीचा भारतात संकर करण्यात येत आहे.

• संदर्भ ग्रंथ :

1. आर्थिक प्रणाली – डॉ  राजगुरू आगरकर.

2. समस्या शंभर कोटीची – जनगनणा – 2001

- वि-ज- गोडबोले – दास्ताने प्रकाशन पुणे. (2001)

3. आर्थिक विकास सर्वे प्राकृतिक संसाधन –

डॉ रिता माथुर – आर.बी.एम ए.पटली जयपूर 1989

4. भारतीय अर्थव्यवस्था – प्रा.एन.एल. चव्हाण प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव.

5. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था – डॉ. माधव बिरादार